GOVERNMENT OF MAHARASHTRA

सत्यमेव जयते

पत्र क्रमांक/पोउआगुन्हे(आर्थिक)/२१/११
पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे शहर.
दिनांक - १०/०१/२०११

**राजेंद्र बा. डहाळे**
पोलीस उप आयुक्त
पुणे शहर

प्रति,

मा. सह संचालक,
तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, पुणे

विषय :- वाढत्या सायबर गुन्हयाबाबत व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करावयाच्या जागृकतेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन सायबर गुन्हयामध्ये अत्यंत जलद गतीने वाढ होत आहे. संगणकाचा वाढता वापर, मोबाईल फोनचा वाढता वापर, नेट बँकींग, मोबाईल बँकींग, सोशल नेटवर्कींग इत्यादी मुळे जे परंपरागत गुन्हे आहेत (जसे खून, दरोडे) यांचे तुलनेत सायबर गुन्हयामध्ये अनेक पटीने वाढ झालेली आहे. परंपरागत गुन्हयांमध्ये दरवर्षी १० ते १२ टक्के वाढ होते तर सायबर गुन्हयामध्ये ८० ते ९० टक्के वाढ झालेली दिसून आली आहे. पुर्वीच्या माहिती तंत्रज्ञान कायदा-२००० या कायद्यामध्ये जास्तीतजास्त कलमे ही अदखलपात्र स्वरुपाची होती. तर परिस्थिती अगदी उलट झाली असून सुधारीत माहिती तंत्रज्ञान कायदा-२००८ अन्वये जास्तीतजास्त दंडात्मक कलमे ही आता दखलपात्र झालेली आहेत. या बदलांची माहिती विद्यार्थ्यांमध्ये असणे अत्यंत आवश्यक आहे. उदा. एखाद्या विद्यार्थ्याने दुसऱ्या विद्यार्थ्याला एसएमएस पाठविला व तो त्यास आक्षेपार्ह वाटल्यास सुधारीत माहिती तंत्रज्ञान कायदा २००८ कलम ६६(१) प्रमाणे तो दखलपात्र गुन्हा होऊ शकेल.

पुणे पोलीसांचे वतीने दिनांक १६/१२/२०१० ते २२/१२/२०१० हा सप्ताह "सायबर सुरक्षा सप्ताह" म्हणून पाळण्यात आला. या दरम्यान शहराचे भागातील विविध महाविद्यालये/विद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी तसेच विविध सोसायटयांमध्ये नागरिकांसाठी अनेक कार्यक्रम घेण्यात आले. सदर सायबर सुरक्षा सप्ताहाचा मुख्य उद्देश हा नागरिक व विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हयां विषयी जागृकता निर्माण करणे आहे. सदरचा कार्यक्रम हा सातत्याने राबविणे अत्यंत आवश्यक आहे. त्या अनुषंगाने जास्तीतजास्त महाविद्यालयांमध्ये "सायबर अवेअरनेस ग्रुप (CAG)" ची स्थापना करण्याबाबत नियोजीत केलेले आहे. सदर ग्रुप हा पोलीस विभाग व संबंधीत

महाविद्यालयांमध्ये समन्वयाचे काम करील. सदर सायबर अवेअरनेस ग्रुपमध्ये महाविद्यालयांचे संगणक विभागाचे किंवा तत्सम विभागाचे एक प्राध्यापक/शिक्षक व ५ विद्यार्थी (शक्यतो अंतिम वर्षातील) असल्यास योग्य राहतील. सदरचा ग्रुप हा महाविद्यालयामध्ये सायबर गुन्हया विषयक विविध कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने पोलीस विभागाला सहकार्य करतील तसेच पोलीस विभागाकडून नियमित स्वरुपात पाठविण्यात येणाऱ्या सूचना, माहिती इत्यादीबाबत संबंधीत ग्रुप हा योग्य ती प्रसिध्दी महाविद्यालयांचे नोटीस फलकावर देणे अशी कार्ये करतील.

यादृष्टीने आपणास विनंती की संबंधीत महाविद्यालयांमध्ये सायबर अवेअरनेस ग्रुप स्थापन करणेबाबत आपणाकडून संबंधीतांना योग्य त्या सूचना व्हाव्यात. संबंधीत महाविद्यालयांमधील १ प्राध्यापक व ५ विद्यार्थी यांची नावे व महाविद्यालयाचा ई-मेल आयडी दिनांक ३१/०१/२०११ पर्यंत पोलीस आयुक्तालयाच्या खालील ई-मेल आयडीवर पाठविण्याबाबत सूचना व्हाव्यात ही विनंती.

crimecyber.pune@nic.in crimecomp.pune@nic.in

सायबर अवेअरनेस ग्रुप लवकरात लवकर प्रत्येक महाविद्यालयात स्थापन झाल्यावर त्यांना वेळोवेळी सायबर गुन्हे शाखेकडून ई-मेलद्वारे सूचना/महितीपत्रक पाठविली जातील व त्याद्वारे महाविद्यालयाचे प्राध्यापक व विद्यार्थ्यांमध्ये सायबर गुन्हयां विषयक जागृकता निर्माण करण्याचे दृष्टीने मदत होईल. पर्यायाने विद्यार्थी/नागरिकांमध्ये सायबर गुन्हयां विषयक जागृकता व संवेदनशीलता निर्माण होणेचे दृष्टीने चालना मिळेल.

आम्हाला खात्री आहे की आपणाकडून पोलीस विभागाला या अनुषंगाने निश्चित सहकार्य मिळेल.

आपणाला नवीन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा..।

आदरपूर्वक,

आपला स्नेहांकित,

(स्वाक्षरी) १०/१/११

( राजेंद्र बा. डहाळे )
पोलीस उप आयुक्त
पुणे शहर

जा क्र तंशिविकापु/संगणक/२०११/ 892

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दिनांक : १८/०१/२०११
18 JAN 2011

**प्रति : प्राचार्य, पुणे शहरातील या कार्यालयाच्या अधिनस्थ सर्व संस्था**

आपणास कळविण्यात येते की उपरोक्त पत्रामध्ये दिलेल्या निर्देशानुसार आपल्या संस्थेमध्ये सायबर अवेरनेस ग्रुप स्थापित करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास ई मेलव्दारे (**nbainfo.ropune@gmail.com**) सादर करावा.

(डी एन शिंगाडे)
प्र सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे